# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
## विद्याशाखा परिषद सभा
## दिनांक ११.०८.२०१५
## इतिवृत्त

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेची सभा मंगळवार दिनांक ११.०८.२०१५ रोजी आयोजित कऱण्यात आली होती. या सभेस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ.शरणकुमार लिंबाळे | ( मा.अध्यक्ष व संचालक ) |
| २) | डॉ.लक्ष्मीकांत देशमुख | सदस्य |
| ३) | डॉ.के.जी.रणवीर | सदस्य |
| ४) | डॉ.मनोज किल्लेदार | सदस्य |
| ५) | प्रा.राम ठाकर | सदस्य |
| ६) | डॉ.उमेश राजदेरकर | सदस्य |
| ७) | प्रा.दादासाहेब मोरे | सदस्य |
| ८) | प्रा.प्रवीण घोडेस्वार | सदस्य |
| ९) | प्रा.नागार्जून वाडेकर | सदस्य |
| १०) | प्रा.अमोल देवरे | निमंत्रित सदस्य |
| ११) | प्रा.असिफ शेख | निमंत्रित सदस्य |

या सभेस पुढील सदस्य कार्यबाहुल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत, त्यांनी तसे अगोदर कळविले होते.

१) डॉ.तुकाराम पाटील, पुणे
२) डॉ.नंदिनी दिवाण, मुंबई
३) डॉ.अशोक चौसाळकर,कोल्हापूर
४) डॉ.मोहन खेरडे, अमरावती
५) डॉ.जयदीप निकम, नाशिक
६) डॉ.माधवी धारणकर, नाशिक

प्रथमत: बैठकीच्या सुरुवातीला संचालकांनी सर्व सदस्यांचे स्वागत केले व बैठकीस प्रारंभ झाला. या बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले.

**ठराव** : एम. ए. शिक्षणक्रम अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू ह्या विषयात सुरु करण्यासंदर्भात चर्चा होऊन एम. ए. शिक्षणक्रम भाषा व सामाजिकशास्त्रे विषयांत सुरु करण्याची शिफारस करण्यात आली , मात्र जोपर्यंत सर्व पुस्तके तयार होत नाही तोपर्यंत कोणताही शिक्षणक्रम जाहीर करण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला.

**८) विषय क्र.बी.१ / एफ-१७३ / २०१५ / ८**

बी. ए. वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन शिक्षणक्रमाच्या पुनर्रचनेस मंजूरी देणे.

बी. ए. वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन शिक्षणक्रमाच्या अभ्यासक्रम पुनर्रचनेचीही मोठी गरज होती. हे काम देखील हाती घेण्यात आलेले असून अभ्यासक्रम तयार करण्यात आला. कृपया सदर बैठकीत सादर होणाऱ्या पुनर्रचित अभ्यासक्रमास मान्यता द्यावी..

**ठराव** : वरील विषयावर चर्चा होऊन बी. ए. वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन शिक्षणक्रमाच्या पुनर्रचनेस मंजूरी देण्यात आली.

**९) विषय क्र.बी.१ / एफ-१७३ / २०१५ / ९**

एम. ए. वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन शिक्षणक्रम सुरु करण्यास मंजूरी देणे

एम. ए. वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन शिक्षणक्रम विकसनाचे काम यापूर्वी शैक्षणिक सेवा विभागाकडे सोपविण्यात आलेले होते. परंतु विद्याशाखेने बी. ए. वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन हा शिक्षणक्रम विकसीत करुन तो राबविल्याने पदव्युत्तर शिक्षणक्रम विकसनाचे कामही विद्याशाखेने करावे असे ठरले. एम. ए. वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन विकसनाचे काम विद्याशाखेने हाती घेतले आहे. सदर बैठकीत सादर केलेल्या अभ्यासक्रमास मंजूरी द्यावी..

**ठराव** :वरील विषयावर चर्चा होऊन एम. ए. वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन शिक्षणक्रमाच्या अभ्यासक्रमास आणि एम. ए. वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन शिक्षणक्रम सुरु करण्यास मंजूरी देण्यात आली.

**१०)विषय क्र.बी.१ / एफ-१७३ / २०१५ / १०**

'ज्ञानगंगोत्री' त्रैमासिकाच्या संपादक मंडळाची पुनर्रचना करण्याबाबत

**ठराव** : 'ज्ञानगंगोत्री' त्रैमासिक हे वस्तुतः ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात ( M.Lib. & I.Sc.) च्या 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र' : घटना, घडामोडी, भाष्य ( LTB 013 ) या अभ्यासक्रमाचे अध्ययन साहित्य म्हणून प्रकाशित केले जाते. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून प्रसिध्द होणाऱ्या अंकांसाठी खालीलप्रमाणे संपादक मंडळाला मान्यता देण्यात आली.

**५) विषय क्र.बी.१ / एफ-१७३ / २०१५ / ५**

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राने विकसित केलेले एम. ए. हिंदी, मराठी आणि इंग्रजी या शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्य स्वीकारण्यास व अंमलबजावणी करण्यास मंजूरी देणे.

एम. ए. शिक्षणक्रमाची निकड वारंवार व्यक्त करण्यात आलेली आहे. परंतु यापूर्वी विद्याशाखेतील अपुरे मनुष्यबळ विचारात घेता या कामास गती देता आलेली नाही. मा. कुलगुरुंनी ही अडचण विचारात घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागाने तयार केलेले एम. ए. हिंदी, एम. ए. मराठी व एम. ए. इंग्रजी या शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य वापरुन एम. ए. शिक्षणक्रम निवड केलेल्या अभ्यासकेंद्रामार्फत राबविण्याची कल्पना मांडली. ह्या शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य स्वीकारणे व तो सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून राबविणे यास मंजूरी देण्याविषयी प्रस्ताव मांडत आहे.

**ठराव** : वरील विषयावर चर्चा होऊन शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राने विकसित केलेले एम. ए. हिंदी, मराठी आणि इंग्रजी या शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्य स्वीकारण्यास व अंमलबजावणी करण्यास मंजूरी देण्यात आली.

**६)विषय क्र. बी.१ / एफ- १७३ / २०१५ / ६**

एम. ए. मराठी, हिंदी व इंग्रजी या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य विद्यापीठाच्या वेबसाईटवर टाकणेबाबत :

**ठराव** : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर च्या दूरशिक्षण केंद्राने विकसित केलेला एम. ए. मराठी, हिंदी आणि इंग्रजी विषयातील पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम आपल्या विद्यापीठाने स्वीकारला आहे. या तीनही विषयांतील पदव्युत्तर शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्य शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राने विकसित केलेले तेच अध्ययन साहित्य विद्यार्थ्यांना देण्याचे ठरविण्यात आले आहे. हे शिक्षणक्रम मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमार्फत राबविण्यात येत आहेत. या शिक्षणक्रमातील विविध विषयांना सध्या झालेली प्रवेश क्षमता विचारात घेऊन सदरचे अध्ययन साहित्य विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यास मंजूरी देण्यात आली.

**७) विषय क्र.बी.१ / एफ-१७३ / २०१५ / ७**

अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू ह्या विषयात एम. ए. शिक्षणक्रम सुरु करण्यास मंजूरी देणे.

एम. ए. शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य तयार करुन आपल्या विद्यापीठाचा एम. ए. शिक्षणक्रम विकसीत करणे फार आवश्यक आहे. त्या दृष्टीने अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू ह्या विषयात एम. ए. शिक्षणक्रम विकसीत करण्याचे काम हाती घेण्यात आले. प्रत्येक विषयाच्या राज्यस्तरीय लेखक-संपादक समितीची निवड करुन अभ्यासक्रम तयार करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. तरी कृपया एम. ए. शिक्षणक्रम वरील विषयांमध्ये सुरु करण्यास मान्यता द्यावी....